माहितीचा अधिकार

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**प्राप्त झालेले व्दितीय अपील**

**अपील क्रमांक : १०५०/२०२२**

**अपिलार्थी, श्री. नरेशकुमार स्वरुपचंद जैन**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा विभागीय वाहतुक अधिकारी,**
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, गणेशपेठ बस स्थानकाचे मागे, मॉडेल मिल रोड, नागपूर-४४००१८

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक,**
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, गणेशपेठ बस स्थानकाचे मागे, मॉडेल मिल रोड, नागपूर-४४००१८

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर *नागपूर*

**व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १३.०८.२०२४**

**अपीलकर्ता : उपस्थित**
**जन माहिती अधिकारी : उपस्थित**
**प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित**

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २७.१२.२०२१ | ०४.०१.२०२२ (हस्तांतरीत) व ३१.०१.२०२२ | ०२.०३.२०२२ | ०५.०४.२०२२ |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी तथा सुरक्षा व दक्षता अधिकारी, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ मुंबई यांच्याकडे **दिनांक २७.१२.२०२१** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी "विभागीय कार्यशाळा रा.प.नागपूर येथील सुरक्षा रक्षकाव्दारे रा.प. खातेवाहनाची चुकीच्या नोंदी केल्याबाबत हे विषयांकित निवेदन दिनांक १६.०८.२०२० रोजी मा. मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी, रा.प. मध्यवर्ती कार्यालय मुंबई यांच्याकडे देण्यात आला असता, त्याअनुषंगाने मा.व. सुरक्षा व दक्षता अधिकारी रा.प. नागपूर यांनी मा. मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी रा.प. मुंबई यांच्याकडे अहवाल सादर केला आहे, मला या चौकशी अहवालाची प्रत व सदर अहवालासोबत पाठविण्यात आलेले संपुर्ण सहपत्रे, कागदपत्रे व संबंधितांचे बयाण/जबाबाच्या प्रती मला प्रमाणित करुन पुरविण्यात यावी तसेच सदर अहवालाच्या अनुषंगाने मा. विभाग नियंत्रक रा.प.नागपूर यांचेकडे पत्र क्र. १४१९, दि. ०४.१०.२०२१ नुसार प्रकरण कार्यवाहीस्तव पाठविण्यात आलेले आहे, मला पत्र क्रं. १४१९ दि. ०४.१०.२०२१ ची प्रत प्रमाणित करुन पुरविण्यात यावी " इ. माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्ज जन माहिती अधिकारी तथा सुरक्षा व दक्षता अधिकारी, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ मुंबई यांनी दिनांक ०४.०१.२०२२ रोजी जन माहिती अधिकारी तथा विभागीय वाहतुक अधिकारी, गणेशपेठ, बसस्थानकाचे मार्ग, मॉडेल मिल रोड, रा.प.विभागीय कार्यालय नागपूर यांचेकडे कलम ६(३) नुसार हस्तांतरीत केला व त्याची प्रतिलिपी अपिलार्थीस दिलेली आहे.

त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा विभागीय वाहतुक अधिकारी, रा.प. नागपूर यांनी दिनांक ३१.०१.२०२२ रोजी शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण २०१२/९८९/प्र.क्र.४७९/सहा, दि. १७.१०.२०१४ नुसार शासकीय कर्मचारी/अधिकाऱ्यास त्याच्या सेवा नियमांतर्गत कामगिरीबाबतचा अहवाल यासारखी वैयक्तिक तपशिलासंबंधातील माहिती देण्याचे बंधन माहिती अधिकाऱ्यावर नसल्याचा निर्णय मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेला आहे. सबब, आपण मागितलेली माहिती ही वैयक्तिक स्वरुपाची असल्याने ती माहिती आपणास देता येऊ शकत नाही. तसेच सदर अहवालाच्या अनुषंगाने मागणी केलेल्या पत्र क्रमांक १४१९ दिनांक ०४.१०.२०२१ ची छायांकित प्रत प्रमाणित करुन या पत्रासोबत आपणास नोंदणीकृत टपालाव्दारे नि:शुल्क पुरविण्यात येत आहे, असे अपिलार्थीस कळविले आाहे.

तद्नंतर अपिलार्थी यांनी **दिनांक ०२.०३.२०२२ रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे "मागितलेली माहिती वैयक्तिक स्वरुपाची नसताना माहिती अधिकारी यांनी पुरविली नाही" असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १५.०३.२०२२ रोजी सुनावणी घेवून दिनांक ०५.०४.२०२२ अन्वये, जन माहिती अधिकारी तथा विभागीय वाहतुक अधिकारी, रा.प. नागपूर यांनी केलेली कार्यवाही योग्य असल्याचे व विहीत मुदतीत केल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येत असल्याचे नमूद करीत अपील अर्ज निकाली काढलेला आहे.

त्याविरुध्द अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दिनांक १२.०४.२०२२ रोजी** " जन माहिती अधिकारी यांनी माहिती देणे नाकारण्याच्या हेतुने जे कारण नमूद करुन माहिती देण्यास नकार दिला ते या प्रकरणात लागू होत नाही " असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपील अर्ज आयोग कार्यालयास दिनांक १८.०४.२०२२ रोजी प्राप्त झाला आहे. त्यावर दिनांक ०२.०७.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. मात्र त्यावेळी सुनावणीची कार्यवाही पुर्ण होऊ न शकल्याने त्यावर आज दिनांक १३.०८.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आलेली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी हे ऑनलाईन पध्दतीने उपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी हे ऑनलाईन पध्दतीने सुनावणीस उपस्थित आहेत.

अपिलार्थी श्री. जैन यांनी त्यांच्या लेखी व मौखिक युक्तीवादात करण्यात आलेली कार्यवाही ही त्यांच्याच तक्रारीवर करण्यात आली असल्यामुळे याबाबतीत माहिती प्रदान करणे हे जन माहिती अधिकारी यांचेवर बंधनकारक असल्याचे नमूद केले आहे. तसेच मा. सर्वोच्च न्यायालय यांनी गिरीश रामचंद्र देशपांडे विरुध्द केंद्रीय माहिती आयोग या प्रकरणात दिलेला निर्णय, त्याअनुषंगाने महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने दिनांक १७.१०.२०१४ रोजी जारी केलेले परिपत्रक व प्रस्तूत प्रकरणातील वस्तुस्थिती हया दोन वेगवेगळया गोष्टी असून एखाद्या कर्मचाऱ्याला बजावलेले ज्ञापन, कारणे दाखवा नोटीस व शिक्षा आदेश ही वैयक्तिक स्वरुपाची माहिती नसून मा. सर्वोच्च न्यायालय यांनी नुकताच दिलेला CPIO विरुध्द श्री. सुभाषचंद्र अग्रवाल या आदेशामध्ये माहितीचा जो भाग उघड केल्यानंतर सार्वजनिक हितास व कायदा व व्यवस्थेला अथवा त्रयस्थ व्यक्तीला बाधा पोहचेल, अशा स्वरुपाची संकलित माहिती अथवा उपलब्ध असलेल्या अभिलेखातील माहिती वगळून उर्वरित माहिती सार्वजनिक हिताच्या दृष्टीने उघड करणे आवश्यक आहे. त्यामुळे या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी मागितलेली माहिती पुरविणे बंधनकारक असल्याचे नमूद केले आहे.

प्राधिकरणाच्या वतीने याबाबतीत जन माहिती अधिकारी यांनी घेतलेली भुमिका, राज्य शासनाचे दिनांक १७.१०.२०१४ रोजीचे परिपत्रक तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा दाखला देत जन माहिती अधिकारी यांनी घेतलेली भुमिका व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी पारीत केलेला आदेश हा माहिती अधिकार अधिनियमाशी सुसंगत असल्याचे स्पष्टपणे नमूद केले आहे. प्रस्तूत प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालय यांनी यांच्या श्री. गिरीश रामचंद्र देशपांडे विरुध्द केंद्रीय माहिती आयोग यात परिच्छेद क्र. १३ मध्ये खालीलप्रमाणे निरीक्षण नोंदविले आहे.

"We are in agreement with the CIC and the courts below that the details called for by the petitioner i.e. copies of all memos issued to the third respondent, show cause notices and orders of censure/punishment etc. are qualified to be personal information as defined in clause (j) of Section ८(१) of the RTI Act. The performance of an employee/officer in an organization is primarily a matter between the employee and the employer and normally those aspects are governed by the service rules which fall under the expression "personal information", the disclosure of which has no relationship to any public activity or public interest. On the other hand, the disclosure of which would cause unwarranted invasion of privacy of that individual. Of course, in a given case, if the Central Public Information Officer or the State Public Information Officer of the Appellate Authority is satisfied that the larger public interest justifies the disclosure of such information, appropriate orders could be passed but the petitioner cannot claim those details as a matter of right."

याबाबींचा पुनरुच्चार मा. सर्वोच्च न्यायालय यांनी त्यांच्या कॅनरा बँक विरुध्द सी.एस. श्याम या प्रकरणात देखील केलेला आहे. प्रस्तूत प्रकरणी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी घेतलेली भुमिका मा. सर्वोच्च न्यायालय यांच्या वरील दोन्ही निर्देशाशी सुसंगत असून दिनांक १७.१०.२०१४ रोजीच्या महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या परिपत्रकानुसार करण्यात आलेली असल्याचे आढळून येते. ही बाब लक्षात घेता, प्रस्तूत प्रकरणी दिलेला प्रतिसाद व पारीत केलेला आदेश हा माहितीचा अधिकार अधिनियमाशी सुसंगत असल्यामुळे प्रस्तूत व्दितीय अपील अर्ज फेटाळण्यात येत आहे.

**आदेश**

**अपील अर्ज फेटाळण्यात येत आहे.**

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : २५.०९.२०२४**

जावक क्रमांक 7256 दिनांक 4 OCT 2024

M-2024/1050-2022/जैन